प्रेसनोट दि.२१/०८/२०१७

# बजाज फायनान्सच्या नावे कर्ज देण्याच्या बहाण्याने फसवणुक करणाऱ्या टोळीस सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी ठाण्यातुन केली अटक

पाटील इस्टेट पुणे येथे वास्तव्यास राहुन सुतारकाम करुन उपजिवीका चालविणाऱ्या एका नागरीकास फोन करुन बजाज फायनान्स येथुन बोलत आहे असे सांगुन, तुमचे बजाज फायनान्सचे रेकॉर्ड चांगले असुन तुम्हाला २ लाख रुपये कर्जाची ऑफर आहे व तुम्हाला ६ टक्के व्याजदराने कर्ज मिळेल असे सांगितले. त्यासाठी २० हजार रुपयांची पॉलीसी किंवा हॉलीडे पॅकेज घ्यावे लागेल. त्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड व दोन फोटो व्हॉटसअॅपवर पाठविण्यास सांगितले. त्याप्रमाणे आधारकार्ड, पॅनकार्ड व दोन फोटो व्हॉटसअॅपवर पाठविले व दिलेल्या अकाऊंटवर २०,०००/- रुपये NEFT व्दारे भरले. त्यानंतर ५ लाख रुपयांची ऑफर आहे, डीपॉझीटसाठी, सीबील खराब आहे. तुमचा एरीया रेड झोनमध्ये आहे असे सांगुन वेगवेगळे कारणे सांगुन एकुण ३,६०,०००/- रुपये फसवणुक करणाऱ्या टोळीने दिलेल्या बॅंक अकाऊंटवर भरण्यास भाग पाडले. त्यानंतरही कर्ज न मिळल्याने व आणखी पैशाची मागणी होत असल्याने अर्जदार यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आले व त्यांनी सायबर क्राईम सेलकडे अर्ज केला. सदर तक्रारी अर्जाच्या चौकशी अंती खडकी पोलीस स्टेशन गु.र.नं.२११/२०१७ भादवि कलम ४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांचा समांतर तपास सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत होता. आरोपींनी फिर्यादी यांच्याशी संपर्क करण्यासाठी वापरलेले मोबाईल क्रमांक व बॅंक अकाऊंटचे विश्लेषण करुन आरोपी नौपाडा, ठाणे भागात कॉल सेंटर चालवित असल्याचे निष्पन झाल्याने सायबर क्राईम सेलचे पोलीस निरीक्षक गजानन पवार स्टाफसह ठाणे येथे गेले असता महिला नामे अनिता अरविंदकुमार चौहाण वय – २९ वर्षे रा. बाळकृष्ण नगर, ए ब्लॉक, सहाड पाठक, उल्हासनगर, ठाणे व इसम नामे दिपक मनोज सिंग वय ३० वर्षे रा. ऑर्नेट इन्केल्व्ह, बी विंग, २०४, नालासोपारा (ईस्ट) हे पहिला मजला, रुक्मिणी बिल्डींग, लोंढे कंपाऊंड, नौपाडा, ठाणे येथे बनावट कॉल सेंटर चालवित आल्याने त्यांना तात्काळ दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. त्यांच्याकडुन गुन्ह्यात वापरलेले ७ मोबाईल, पॅनकार्ड, आयकार्ड व व्हिजीटींगकार्ड जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी आणखी बऱ्याच नागरीकांची फसवणुक केली असुन त्याबाबत तपास सुरु आहे. आरोपींना पुढील कारवाईकामी खडकी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजानन पवार, कर्मचारी नितेश शेलार, राहुल हंडाळ, शाहरुख शेख, अस्लम आत्तार, दिपक भोसले, राजकुमार जाबा, संतोष जाधव, दिपक माने, ज्योती दिवाणे व अजित कुऱ्हे यांनी केली.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, मोबाईल नंबर ८४५१०७३७५२, ७२६२८९१९६३, ७०५८३२४५००, ८४५१०७३८२९, ९०७६१०३०४०, ७९००१४५८३६, ८६५५३०५८६६ याव्दारे कर्ज मिळण्यासाठी फोन आले असल्यास किंवा फेडरल बॅंक अकाऊंट नंबर १५९५०२०००५७३३, एस.बी.आय. बॅंक अकाऊंट नंबर ३६५९६२४६७३३, लक्ष्मी विलास बॅंक अकाऊंट नंबर ०२८३३६००००००१६९५ व आंध्रा बॅंक अकाऊंट नं. २५५११०१०००१४०७३ या अकाऊंटवर पैसे भरले असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. तसेच कर्जाची आवश्यकता असल्यास मान्यताप्राप्त बॅंका किंवा संस्था यांच्या नजिकच्या कार्यालयात जावुनच कर्जाबाबत व्यवहार करावेत.